सं.फौ.ख.क्रं. ७०१/२०२०

सरकार –वि– महादेव साटोटे

नि.क्र. २२ खाली

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव — रविंद्र श्रीकृष्ण चराटे,

वय. ३८ वर्षे, व्यवसाय — शेतमजुरी,

राहणार – मनसगाव, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

**सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी वकील.**

१. दिनांक २६.०५.२०१८ रोजी ग्राम मनसगाव येथे आरोपीच्या घरी माझ्या समक्ष पंचनामा झाला नव्हता. आता मला घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी पंच क्र. २ म्हणुन माझी सही आहे. त्यामधील मजकुर मला माहित नाही. त्याला सहीपुरता **नि.क्र.२३** देण्यात येतो.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे, सरकारी वकीलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली असता त्यांना परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, ग्राम मनसगाव येथे दि. २६.०५.२०१८ रोजी मी आरोपीच्या घराजवळ पंचनामा करण्याकरीता पंच म्हणून हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष आरोपीकडून दोन टिनाच्या डब्ब्यात असलेले मोहाफुलाचे रसायन, दोन प्लास्टीक पोकळ नळ्या, जर्मन चरबीमध्ये असलेली तीन लीटर गावठी हातभट्टी दारु, २४ टिनाच्या डब्ब्यात असलेले मोहाफुल रसायन व प्लास्टीक कॅनमध्ये असलेली १० लिटर हातभट्टी दारु असा एकूण ९९१३०/– रुपयांचा मुद्देमाल माझ्यासमक्ष जप्त करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार करुन तो मला वाचून दाखविण्यात आला व मी त्यावर वाचून समजून सही केली. आरोपीला मी ओळखतो कारण की तो माझ्या गावचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबत माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत माझे चांगले संबंध असल्यामुळे मी त्याला शिक्षेपासून वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. बी. एस. शेगोकार, वकील यांनी नाकारला.**

श्रवणोत्तर स्विकृत
स्वा/–
(एन. डी. मेश्राम)
न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव
दि. १४.१०.२०२५

माझे समक्ष
स्वा/–
(एन. डी. मेश्राम)
न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव
दि. १४.१०.२०२५